**स्मरणपत्र** **अत्यंत महत्वाचे/तात्काळ**

# University of Mumbai


दुरध्वनी क्र. ०२२-२२७० ८७३८
०२२-२२६१ ८९८७
Email : supt.statunit@gmail.com

**सांख्यिकी कक्ष**
खोली क्र २०२, दुसरा मजला,
मुंबई विद्यापीठ, फोर्ट आवार,
महात्मा गांधी मार्ग,
मुंबई - ४०० ०३२.


**No. UDSTAT/ICD/2018-19/ 135 of 2019** दिनांक : ३१ जानेवारी, २०१९.

**परिपत्रक :-**

**विषय : उच्च व तंत्र शिक्षण विभागातील सर्व विषयाची माहिती पुस्तक रूपाने प्रकाशित करण्यासाठी आपली माहिती सादर करणेबाबत.....**

**संदर्भ : १. क्र. युएनआय/६०/१८/अधी.३/विशि १/२७९ दिनांक ८ जानेवारी, २०१९.**
**२. No. UDSTAT/ICD/2018-19/132 of 2019, दिनांक २४ जानेवारी, २०१९**

---

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयांकीत संदर्भित पत्राचे कृपया अवलोकन करावे.

सर्व संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य, विद्यापीठ विभाग व कक्ष प्रमुख/संचालक, आपणांस पुनःश्च निदर्शनास आणून देवू इच्छितो की, वरीष्ठ प्रशासन अधिकारी, शिक्षण संचालनालय (उ.शि.), महाराष्ट्र राज्य, पुणे, यांच्या उल्लेखित पत्रानुसार **शैक्षणिक वर्षे २०१७-१८** या कालावधितील उच्च व तंत्र शिक्षण विभागातील सर्व विषयाची माहिती पुस्तक रूपाने प्रकाशित करण्याच्या हेतूने आपणांस कळविण्यात आलेले आहे.

**सदर माहिती संचालनालयास अत्यावश्यक असल्याकारणाने आपणांस कक्षाद्वारे पत्रस्वरूपी कळविलेले असताना देखील आपल्या महाविद्यालयाची, विभागाची व कक्षाची माहिती अद्यापपर्यंत सदर कक्षास प्राप्त झालेली नाही व वेळेत संचालनालयास ती सादर न झाल्यामुळे त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केलेली आहे.**

**तरी उपरोल्लेखित संदर्भित बाबींचे गांभिर्य लक्षात घेता, आपणास पूनःश्च ज्ञात करण्यात येते की, संचालनालयाच्या व मा. कुलगुरूंच्या आदेशानुसार विवरण पत्रामध्ये नमूद केल्याप्रमाणे आपल्या माविद्यालयाची, विभागाची व कक्षाची महत्वपुर्ण अचूक माहिती सोमवार, दिनांक ४ फेब्रुवारी, २०१९ पर्यंत** नोडल अधिकारी/अधिक्षक (AISHE/MIS CELL), सांख्यिकी कक्ष, दुसरा मजला, खोली क्र. २०२ (supt.statunit@gmail.com) येथे Email व Hard Copy व्दारे आपल्या सही व शिक्क्यासह विनाविलंब व कोणतीही सबब न दाखविता सदर कक्षास सादर करणे अनिवार्य आहे व ती शासनास संचालनालयामार्फत विनाविलंब सादर करणे सोयीस्कर होईल, तसे न झाल्यास शासनाकडून घेण्यात येणा-या कार्यवाही संदर्भात आपण संस्था प्रमुख/विभाग प्रमुख या नात्याने सर्वस्वी जबाबदारी आपली राहिल, याची आपण आपल्या उच्च स्तरावर गांभिर्याने योग्य ती दखल घ्यावी.

**टिप : संचालनालयामार्फत विचारण्यात आलेली महत्वपुर्ण संबंधित माहिती आपल्याकडून** सादर **झालेली असल्यास सदरचे परिपत्रक दुर्लक्षित करण्यात यावे, याची नोंद घ्यावी.**

**सोबत : विवरण पत्रांची प्रत**

(डॉ. अजय देशमुख)
कुलसचिव

**प्रति,**
**सर्व संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य**
**विद्यापीठ विभाग व कक्ष प्रमुख आणि**
**अध्यासन व केंद्र यांचे संचालक**